**ठळक बातम्या**

- राज्य सरकार एक एप्रिलपासून माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान राबवणार, प्रलंबित सिंचन प्रकल्पांसाठी कर्ज घेऊन ८ लाख हेक्टर जमिनीला सिंचनाखाली आणणार

- २३ फेब्रुवारी ते २५ मार्च दरम्यान विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन, ६ मार्चला अर्थसंकल्प

- चंद्रपूर महापालिकेत सत्तेसाठी भाजपा आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एकत्र, सर्वाधिक नगरसेवक असलेला काँग्रेस सत्तेबाहेर

**आणि**

- लोकसभेतला गदारोळ आटोक्यात, अर्थसंकल्पावर चर्चा सुरू

**<><><><><>**

राज्यात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान' राबविण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला सरकारनं मान्यता दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मंत्री यावेळी उपस्थित होते. १ एप्रिलपासून वर्षभरासाठी हे अभियान राबवलं जाईल. त्यात जीवनशैली आणि आहारातल्या बदलांना प्राधान्य, प्रतिबंधात्मक उपाय तसंच वेळेवर उपचार आणि पुनर्वसनाला महत्त्व दिलं जाणार आहे. याअंतर्गत विविध पुरस्कारही दिले जाणार आहेत. राज्य मंत्रीमंडळाच्या इतर निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट 1.30 मि. - - -**

*(राज्यातल्या ८ लाख हेक्टर जमिनीला सिंचनाखाली आणण्यासाठी राज्य सरकारनं नाबार्डकडून आणखी साडे ७ हजार कोटी रुपयांचं कर्ज घेणार आहे. अपूर्ण असलेले ५७ सिंचन प्रकल्प, कालवे आणि पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या वितरण प्रणालीची कामं यातून पूर्ण केली जाणार आहेत. याच कामासाठी पहिल्या टप्प्यात साडे ७ हजार कोटी रुपयांच्या कर्जाला राज्य सरकारनं मार्च २०२४ मध्ये मान्यता दिली होती.*

*नवी मुंबईच्या शेजारी होणाऱ्या तिसऱ्या मुंबईतल्या सर्व विकास प्रकल्पांचं भूसंपादन आणि भूवाटपाच्या सर्वसमावेशक धोरणाला राज्य मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी सहा हजार कोटींचं कर्ज घ्यायला सरकारनं आज मान्यता दिली. ९६ टक्के लोकांनी जमीन अधिग्रहणासाठी तयारी दाखवली असल्यानं हे अधिग्रहण जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला. नवीन एमआयडीसी सुरू करण्यासाठी पुणे जिल्ह्यातल्या इंदापूर तालुक्यात रत्नपुरी मळ्यातली एक हजार एकर जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करायचा निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. कोल्हापूर जिल्ह्यात करवीर तालुक्यातल्या मौजे विकासवाडी इथं आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडीयम उभारण्यासाठी १२ हेक्टरहून अधिक जमीन जिल्हा क्रिकेट संघटनेला मोफत द्यायलाही सरकारनं मंजुरी दिली.*

*राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात बक्षीस मिळविणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक आणि प्रयोगशाळा परिचर यांना देण्यात येणाऱ्या बक्षिसाच्या रक्कमेत राज्य सरकारनं वाढ केली आहे. सर्व गटांमधल्या प्रथम विजेत्याला ५१ हजार, द्वितीय क्रमांकाला ३१ हजार आणि तिसऱ्या क्रमांकावर असलेल्यांना २१ हजार, चौथ्या क्रमांकावरच्या स्पर्धकाला ११ हजार आणि ३ उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १० हजार रुपये बक्षीस दिलं जाईल.)*

<><><><><>

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील आडोशी बोगद्याजवळ काही दिवसांपूर्वी घडलेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या अवजड वाहनांची व्यापक तपासणी करण्याचे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

अपघात रोखण्यासाठी केवळ नियमांची केवळ अंमलबजावणी करुन चालणार नाही. तर एक  जागरूकतेची चळवळ निर्माण झाली पाहिजे असंही ते म्हणाले.

<><><><><>

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या २३ तारखेपासून सुरू होणार आहे.  या अधिवेशनाचा कालावधी २५ मार्चपर्यंत असून ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्यात येईल. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या आज झालेल्या कामकाज सल्लागार समिती बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

<><><><><>

चंद्रपूर महापालिकेत भाजपा आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सत्तास्थापनेसाठी एकत्र आले आहेत. सव्वा वर्षासाठी दोन्ही पक्षांचा महापौर विराजमान होणार आहे. त्यानुसार भाजपाच्या संगीता खांडेकर यांना आज महापौर पदाची संधी मिळाली. आज झालेल्या निवडणुकीत त्यांना ३२ मतं मिळाली तर काँग्रेसच्या उमेदवार वैशाली महाडोळे यांना ३१ नगरसेवकांनी पाठिंबा दिला. उपमहापौरपदी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रशांत दानव विजयी झाले आहेत. ६६ सदस्य असलेल्या या महापालिकेत महापौरपदाच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे दोन नगरसेवक अनुपस्थित राहिले. तर एमआयएमच्या एका नगरसेवकाने तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला.

चंद्रपूरच्या विकासासाठी हे सर्व पक्ष एकत्र आल्याची माहिती आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षानं चंद्रपुरात घेतलेल्या भूमिकेचे परिणाम राज्यभरात उमटतील असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.

**- - - होल्ड - सपकाळ बाइट - - -**

**- <><><><><>**

छत्रपती संभाजीनगरच्या महापौरपदी भाजपाचे समीर राजुरकर यांची निवड झाली आहे. आज झालेल्या निवडणुकीत राजुरकर यांना ७०, तर एमआयएमचे उमेदवार अशोक हिवराळे यांना ३३ मतं मिळाली.

नांदेड महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीत भाजपच्या कविता मुळे विजयी झाल्या. त्यांना ८१ पैकी ५० मतं मिळाली. तर उपमहापौर पदी भाजपाचे दीपकसिंह रावत हे विजयी झाले. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपचे धीरज सूर्यवंशी तर उपमहापौरपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन मगदूम यांची अधिकृत घोषणा आज करण्यात आली.

**<><><><><>**

गेल्या आठवड्यापासून लोकसभेत सुरू असलेला गदारोळ आज दुपारी थांबला. विरोधी पक्षाच्या गदारोळांमुळं दुपारी २ पर्यंत कामकाज तहकूब झालं होतं. मात्र दोन वाजेनंतर केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरू झाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(लोकसभेत चर्चेला सुरुवात करताना काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली. या अर्थसंकल्पात वैयक्तिक करदात्यांवरचा बोजा वाढवला असून कंपन्यांना सूट देण्यात आल्याचं ते म्हणाले.*

*या अर्थसंकल्पातून सरकारची जनतेप्रतीची वचनबद्धता दिसून येते असं भाजपाच्या अपराजिता सारंगी आपल्या भाषणात म्हणाल्या. यावेळी त्यांनी विविध देशांशी भारताने केलेल्या मुक्त व्यापार कराराचा उल्लेख केला.*

*समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी हा अर्थसंकल्प दिशाहीन असल्याची टीका केली. आर्थिक आणि सामाजिक विषमतेवर या अर्थसंकल्पात काहीच तोडगा काढलेला नाही असं यादव म्हणाले. तर पश्चिम बंगालला केंद्राकडून येणं बाकी असणाऱ्या एक लाख ९० हजार कोटी रुपयांचा मुद्दा तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी यांनी उपस्थित केला.*

*राज्यसभेतही आज केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चेला पुन्हा सुरूवात झाली. जागतिक अस्थिरतेच्या या काळात भारत एकटाच स्थिरपणे उभा असल्याचं शिवसेना खासदार मिलिंद देवरा यांनी म्हटलं आहे. तर हा अर्थसंकल्प गरीबविरोधी असल्याची टीका द्रमुक खासदार कनिमोळी यांनी केली. भाजपा खासदार सुरेंद्र सिंह नागर यांनीही अर्थसंकल्पावर आपले विचार मांडले. या अर्थसंकल्पात महिला आणि बालविकासासाठी २८ हजार कोटी रुपये तरतूद केली असली तरी बालकांसाठी केलेल्या खर्चात मोठी कपात केल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार फौजिया खान यांनी निदर्शनास आणून दिलं. हा खर्च जीडीपीच्या केवळ एक टक्के आहे, असं त्या म्हणाल्या. ही चर्चा उद्याही चालू राहील.)*

**<><><><>**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणात मुंबईतल्या विशेष मकोका न्यायालयानं २७ जणांवर आरोप निश्चित केले आहेत. यात कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोई याला फरार आरोपी ठरवण्यात आलंय.

**<><><><>**

अजित पवार यांच्या अपघातात घातपाताची शक्यता व्यक्त करत सखोल चौकशीची मागणी आमदार रोहित पवार यांनी मुंबईत केली आहे. अपघातापूर्वी विमानात काही बिघाड झाला होता का? उड्डाणापूर्वी तपासणी झाली होती का? हँगर सीसीटीव्ही कुठे आहे असे

प्रश्न त्यांनी विचारले. युरोपियन सरकारनं व्हीएसआर कंपनीचे परवाने रद्द केल्यावरही भारतात तिला परवानगी का देण्यात आली होती असा प्रश्नही त्यांनी विचारला.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांच्या वतीनं आयोजित इयत्ता १२ वीच्या परीक्षेला आजपासून सुरूवात झाली.

या परीक्षेसाठी एकंदर १० हजार ६६४ कनिष्ठ महाविद्यालयांमधून १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३८७ मुख्य केंद्रावर ही परीक्षा होत आहे.

<><><><><>

मुंबईतल्या ट्रॉम्बे आणि मालाड जलमार्गामध्ये टप्प्याटप्प्यानं बॅरियर्स उभारून अरबी समुद्र आणि हिंद महासागरात जाणारा प्लास्टिकचा कचरा अडवला जाणार आहे. यामुळे दरवर्षी किमान ६१ टन प्लास्टिक कचरा जाणं टाळता येणार आहे. ही मोहीम नेदरलँड्समधली ओशन क्लीनअप या स्वयंसेवी संस्थेच्या नेतृत्वाखाली महानगरपालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सहकार्यानं राबवण्यात येणार आहे.

<><><><><>

राष्ट्रीय नाट्य विद्यालय ‘एनएसडी’ने आयोजित केलेल्या पंचविसाव्या भारत रंग महोत्सवाचं आज मुंबईत राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांच्या हस्ते उद्घाटन झालं. ज्येष्ठ अभिनेत्री आणि एनएसडीच्या माजी विद्यार्थिनी रोहिणी हट्टंगडी, या महोत्सवाच्या राजदूत आणि अभिनेत्री मीता वशिष्ठ याही यावेळी उपस्थित होत्या. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात भारतीय आणि परदेशी भाषांमधली सहा नाटकांचे प्रयोग होणार आहेत.

//<><><><><>//